www.rajdand.com
सातारा, रविवार
07.01.2024
पृष्ठ : ४ । मूल्य : ४ । मार्गशीर्ष कृ.२६
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
राजदंड
स्थापना १९९९

संगीतकार डॅनियल वेबर याने त्याच्या नव्या गाण्यातून आठवणी ना दिला उजाळा

(पान २ वर)



५ महिन्यानंतर आदित्य एल १ पोहोचले निश्चित स्थळी

बंगळुरू : देशाच्या पहिल्या सौर मोहिमेतील आदित्य एल १ उपग्रहाने सूर्य आणि पृथ्वी यांच्यातील गुरुत्वाकर्षण समतोल बिंदूंपैकी एक बिंदू- लँगरेंज पॉइंट १ (एल-१) वर यशस्वीरित्या पोहोचण्याचा विक्रम केला आहे. पृथ्वीपासून सुमारे १५ लाख किलोमीटर अंतरावर सूर्याच्या दिशेने हे यान ११० दिवसांनी पोहोचले आहे. आदित्य-एल १ ही अवकाशीय सौर वेधशाळा असून, ती सूर्याच्या बाह्य वातावरणाचा अभ्यास करणार आहे. हा यशस्वी टप्पा पार केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही इस्त्रोचे अभिनंदन व्यक्त केले आहे.



भारताने आणखी एक टप्पा पूर्ण केला आहे, असे सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला. ह्भारताने आणखी एक टप्पा पूर्ण केला आहे, असे सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला. भारताची पहिली सौर वेधशाळा आदित्य एल१ हे उपग्रह निश्चितस्थळी पोहोचले आहे. आमच्या शास्त्रज्ञांनी अत्यंत क्लिष्ट आणि गुंतागुंतीच्या अंतराळ मोहिमा यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम केले. त्याचेच हे यश आहे. संपूर्ण देश या कामगिरीसाठी शास्त्रज्ञांचे अभिनंदन व्यक्त करत असताना मीदेखील त्यात सामील होत आहे. मानवतेच्या विकासासाठी विज्ञानाचे नवे नवे क्षितीज गाठण्याचा प्रयत्न आम्ही करत राहू, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

सूर्याचा अभ्यास करण्यासाठी इस्त्रोने आदित्य एल-१ हे अवकाशयान २ सप्टेंबर रोजी प्रक्षेपित केले. सूर्याच्या सर्वात वरील आवरणाचा, म्हणजेच सूर्य प्रभामंडळाचा (करोना) अभ्यास करण्यासाठी हे यान पाठवले आहे. यासाठी आदित्य एल-१ मध्ये वेगवेगळी उपकरणे (पेलोड) बसवण्यात आली आहेत. सौरवादळांचा पृथ्वीच्या वातावरणावर होणारा परिणाम, सूर्याचं तापमान, अतिनील किरणांचा पृथ्वीवर होणारा परिणाम, ओझोनचा थर आणि अंतराळातील हवामान या सर्व गोष्टींचा अभ्यास करण्यासाठी इस्त्रोने ही सौरमोहीम हाती घेतली आहे.

एल-१ म्हणजे काय?

अंतराळातील मोठे वस्तुमान असलेल्या दोन वस्तूंमध्ये (तारे, ग्रह, उपग्रह इत्यादी) गुरुत्वाकर्षण असते. या दोन वस्तूंमधील काही बिंदू असे असतात की तेथे दोन्हींचे गुरुत्वाकर्षण समतोल (बॅलन्स) असते. अशा बिंदूंना लँगरेंज पॉइंट म्हटले जाते. इटालियन संशोधक जोसेफ लुई लँगरेंज यांच्या स्मरणार्थ हे नाव देण्यात आले आहे. सूर्य आणि पृथ्वीदरम्यान आतापर्यंत असे पाच बिंदू खगोल अभ्यासकांना सापडले असून त्यांना एल-१, एल-२, एल-३, एल-४ आणि एल-५ अशी नावे देण्यात आली आहेत. आदित्य हे अंतराळयान एल-१ या बिंदूवरून सूर्याचा अभ्यास करणार असल्याने मोहिमेचे नाव आदित्य एल-१ असे ठेवण्यात आले आहे. अलीकडेच नासा आणि युरोपियन स्पेस एजन्सीने (ईएसए) संयुक्तपणे काढलेल्या सोलर ऑर्बिटर मोहिमेतून तुलनेने लहान सौरवाऱ्यांचा शोध लागला होता. आदित्यच्या निरीक्षणांमधून यावर अधिक प्रकाश पडेल, अशी संशोधकांना अपेक्षा आहे.

आरक्षणासाठी आदिवासी समाजात घुसखोरी होऊ देणार नाही

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची ग्वाही

मुंबई : आरक्षणासाठी आदिवासी समाजात इतर कोणाचीही घुसखोरी नको अशी आदिवासी समाजाची मागणी आहे. आदिवासी समाजात समावेश करावा म्हणून अनेक जातींकडुन मागणी होत आहे. या पार्श्वभुमीवर आदिवासींना संविधानाने दिलेला आरक्षणाचा हक्क हिरावला जाणार नाही, आदिवासींना मिळणा-या 7.5 टक्के आरक्षणात इतरांची घुसखोरी होऊ देणार नाही. ज्या जाती आदिवासी आहेत त्यांना त्यांचा हक्क मिळवुन देवू तसेच आदिवासींवर अन्याय होणार नाही याची काळजी राज्य आणि केंद्र सरकार घेईल अशी ग्वाही आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी दिली.

धुळे जिल्हयातील पिंपळनेर येथे रिपब्लिकन पक्षाच्या आदिवासी आघाडी तर्फे आयोजित आदिवासी एकता महामेळाव्यात प्रमुख मार्गदर्शन म्हणून ना. रामदास आठवले बोलत होते. यावेळी रिपाइंचे रमेश मकासरे, प्रकाश लोंढे, रिपाइंचे गुजरात राज्य अध्यक्ष अशोक कुमार भट्टी, शशिकांत वाघ, भाजपचे भरत गावीत, मोहन सुयर्वंशी, शिवसेना शिंदे गटाचे ॲड. ज्ञानेश्वर ए. खंडे, आणि या आदिवासी मेहामेळाव्याचे आयोजक रिपाइंचे आदिवासी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष संदीप देवरे उपस्थित होते.

काँग्रेस आणि विरोधक केंद्र सरकारवर टीका करतांना संविधान बदलणार अशी खोटी अफवा पसरवीत आहेत. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेले संविधान हे परिपुर्ण संविधान आहे. ते कधीही बदलले जाणार नाही. संविधान बदलणारे स्वतचे बदलले जातील पण संविधान कधीही बदलणार नाही. मोदी हे संविधानाचे संरक्षण आहेत. दलित आदिवासींसाठी प्रधानमंत्री मोदींचे सरकार काम करीत आहे. सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास यानुसार मोदी सरकार काम करीत आहे.

देशाच्या राष्ट्रपती पदाचा बहुमान दलित समाजातुन आलेल्या रामनाथ कोविंद यांना देण्यात आला होता. आता देशाच्या राष्ट्रपती पदाचा बहुमान आदिवासी समाजातुन येणा-या नेत्या द्रोपदी मुर्मु यांना देण्यात आला आहे. त्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे योगदान आहे. त्यामुळे विकास पुरुष नरेंद्र मोदींना तिस-यांदा प्रधानमंत्री बनवण्यासाठी दलित, आदिवासी बहुजन जनता बहुमताने त्यांच्या पाठीशी उभी राहील. असे ना. रामदास आठवले यावेळी म्हणाले.

आदिवासींचे सर्व प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार आदिवासीं सोबत असल्याची ग्वाही ना. रामदास आठवले यांनी दिली. यावेळी आदिवासी तरुण मोठया संख्येने उपस्थित होते.

अकलूजमधील चार डॉक्टरांवर अत्याचाराचा गुन्हा दाखल

अकलूज/(कृष्णा लावंड) पैशांच्या देण्या घेण्यावरून अकलूजमधील वैद्यकिय क्षेत्रात नावाजलेल्या चार डॉक्टरांनी विवाहित महिलेवर अत्याचार केल्याच्या फिर्यादीवरून अकलूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर डॉक्टरांनी माळशिरस न्यायालयात दाखल केलेल्या अटकपूर्व जामिन अर्जावर आज सुनावणी होऊन त्यांना तात्पुरता ९ तारखेपर्यंत जामिन मंजुर करण्यात आला आहे. या घटनेने अकलूज वैद्यकिय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

याबाबत अकलूज पोलीस सुत्रांकडुन मिळालेल्या माहितीनूसार पिडीत महिला ही अकलूज येथील अकलाई हॉस्पिटल येथे काम करत होती. तिने उच्च शिक्षणासाठी ३५ हजार रूपये हॉस्पिटलकडून घेतले होते ते पैसे पगारातून वजा करावेत अशी विनंती सदर पिडीत महिलेने हॉस्पिटलकडे केली होती. या हॉस्पिटलचे संचालक डॉ. भुषण भारत चंकेश्वरा, डॉ. सुनिल सुभाष नरूटे, डॉ. शैलेश भानुदास गायकवाड व डॉ. सचिन सावंत सर्व रा. अकलूज यांनी उसने दिलेले पैसे पगारातून न फेड करता तु आमच्याशी शारीरीक संबंध ठेव अशी त्या महिलेलेकडे मागणी करून फेब्रुवारी २०२२ ते २८ जुन २०२४ दरम्यान अकलाई हॉस्पिटलच्या डॉक्टर रूममध्ये सदर महिलेवर वारंवार अत्याचार केला असल्याची फिर्याद पिडीतेने अकलूज पोलीस ठाण्यात दि. ३ जानेवारी २०२४ रोजी दिली. त्यावरून अकलूज पोलीसांनी चौघा डॉक्टरांविरोधात गु. र. नं. १०/२४, भादवि. ३७६/२, ५०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणी सर्व डॉक्टरांनी गुन्हा दाखल होण्यापुवीच दि. ३० डिसेंबर २०२३ रोजी माळशिरस न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी धाव घेतली असता त्याच दिवशी सुनावणी होऊन न्यायालयाने सर्व डॉक्टरांना अंतिम सुनावणी दि. ९ जानेवारी होइपर्यंत तात्तपुरता जामिन मंजुर केला असल्याची माहिती अकलूज पोलीसांनी दिली.

रुग्णालयाने पतीला मृत घोषित करताच पत्नीची आत्महत्या

मग कळले पती तर अजून जिवंत

ओडिशा : ओडिशाची राजधानी भुवनेश्वर येथे एक दुर्दैवी प्रकार घडल्याची माहिती समोर आली. एसीचा स्फोट होऊन तुमच्या नवऱ्याचा मृत्यू झाला, असा संदेश एका रुग्णालयाने संबंधित व्यक्तीच्या पत्नीला दिल्यानंतर तिला दुःख अनावर झाले. या दुःखातून तिने स्वतःला संपवले. पत्नीचा मृत्यू झाल्यानंतर तिचा पती जिवंत असल्याचे समोर आले आहे. रुग्णालयाच्या हलगजीपणामुळे एका महिलेचा नाहक जीव गेला. या निष्काळजीपणाविरोधात आता रुग्णालयाविरोधात पीडित कुटुंबियांनी आंदोलन सुरू केले आहे.

३४ वषीय दिलीप सामंतराय हा आपल्या तीन सहकऱ्यांसह २९ डिसेंबर रोजी हाय-टेक वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या छतावर एसी कम्प्रेसर दुरूस्तीचे काम करत होता. यावेळी अचानक स्फोट होऊन सर्व कामगार भाजले गेले. दिलीप सामंतराय, ज्योतीरंजन, सीमांचल आणि श्रीतम साहू असे चार कामगारांचे नाव आहे. दुरुस्तीचे काम करत असताना अचानक स्फोट झाल्यामुळे चारही जणांवर याच रुग्णालयात उपचार सुरू होते. ३० डिसेंबर रोजी रुग्णालयाने दिलीपचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचे जाहीर केले. ज्यामुळे त्याची पत्नी सोना (२४) हीला मोठा धक्का बसला. दिलीपच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार झाल्यानंतर तिने स्वतःचे आयुष्य संपविले.

दिलीप यांचे सासरे यांनी या घटनेची माहिती देताना रुग्णालयाविरोधात संताप व्यक्त केला. ते म्हणाले, ३० डिसेंबर रोजी रात्री ९.३० वाजता डॉक्टरांनी दिलीपला मृत घोषित केले. त्यानंतर जळालेल्या अवस्थेतील त्याचा मृतदेह आमच्या ताब्यात देण्यात आला. दुसऱ्या दिवशी आम्ही मृतदेहावर अंत्यसंस्कार केले. रुग्णालयाने म्हटले की, हा दिलीपचा मृतदेह आहे. त्यामुळे माज़्या मुलीला हा धक्का पचवता आला नाही आणि तिनेही स्वतःचे आयुष्य संपविले.

गुरुवारी सायंकाळी उपचार घेत असलेल्या इतर कामगारांपैकी एकाला शुद्ध आली. तेव्हा त्याने स्वतःचे नाव दिलीप असल्याचे सांगितले. यानंतर सदर धक्कादायक प्रकार समोर आला. रुग्णालयाच्या सीईओ स्मिता पाधी यांनी या घटनेनंतर प्रतिक्रिया देताना सांगितले की, एसी कम्प्रेसरची दुरूस्ती करण्याचे काम एका एजन्सीला दिले होते. स्फोट झाल्यानंतर एजन्सीच्या अधिकाऱ्यानेच चार कर्मचाऱ्यांबद्दल आम्हाला माहिती दिली. नातेवाईकांनाही याबाबत माहिती देण्यात आली. ३० डिसेंबर रोजी दिलीप सामंतराय यांचा मृत्यू झाल्यानंतर रितसर सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच मृतदेह कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आला होता. आम्हाला एजन्सीने जी माहिती दिली, तीच आम्ही जाहीर केली.

आता हाती आलेल्या माहितीनुसार, दिलीपच्या कुटुंबियांनी ज्या व्यक्तीवर अंत्यसंस्कार केले, त्याचे नाव ज्योतीरंजन असल्याचे कळत आहे. तसेच ३ जानेवारी रोजी श्रीतम साहू याचाही मृत्यू झाला. आता ज्योतीरंजनच्या कुटुंबियांकडून त्याच्या मृतदेहाची मागणी केली जात आहे. पण त्यावर आधीच दिलीपच्या कुटुंबियांनी अंत्यसंस्कार केले आहेत. दिलीपच्या कुटुंबावरही दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यामुळे सर्वच कामगारांच्या कुटुंबियांनी रुग्णालयाबाहेर आंदोलन सुरू केले.

हुकूमशाही विरोधात दीर्घकालीन वैचारिक, सांस्कृतिक युद्ध जिंकावे लागेल : योगेंद्र यादव

विचारवेध संमेलनात 'लोकशाहीच्या संरक्षणासाठी लोकांचा जाहीरनामा' विषयावर चर्चा

पुणे : 'जमनीत, युरोपात अपयशी ठरलेले हुकूमशाहीचे मॉडेल भारतावर लादण्याचा प्रयत्न होत आहे. त्याचा विरोध करण्यासाठी वैचारिक, सांस्कृतिक युद्ध जिंकावे लागेल. राजकारण हे या युद्धातील अवजार आहे. ते टाळता येणार नाही. काही वेळा आपण असमर्थ ठरलो आहोत. आपण काही लढाया हरल्या तरी युद्ध जिंकू, यात शंका नाही. विचारवेध संमेलनासारखे प्रयत्न त्यासाठी महत्वाचे आहे', असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते योगेंद्र यादव यांनी केले.

विचारवेध असोसिएशन, युवक क्रांती दल आणि महाराष्ट्र गांधी स्मारक निधी यांच्या वतीने आयोजित विचार वेध संमेलनास शनीवारी सकाळी गांधी भवन येथ प्रारंभ झाला. त्यावेळी उद्घाटन सत्रात योगेंद्र यादव बोलत होते. तुषार गांधी, डॉ.कुमार सप्तषी, आनंद करंदीकर, सुभाष लोमटे, श्रीरंजन आवटे , मुकुंद किर्दत , सुनीती सु.र., संदीप बर्वे, नीलम पंडित, सरिता आवाड, हरीश सदानी, गणेश विसपुते आदी मान्यवर उपस्थित होते.

दि.६ आणि ७ जानेवारी रोजी विचारवेध संमेलन - २०२४' चे आयोजन करण्यात आले आहे. गांधी भवन, कोथरूड येथे हे संमेलन होत आहे.' लोकशाहीच्या संरक्षणासाठी लोकांचा जाहीरनामा ' ही या संमेलनाची संकल्पना असून विविध आंदोलनातील कार्यकर्ते तसेच विचारवंत सहभागी झाले आहेत.

शनिवारी ६ जानेवारी रोजी सकाळी साडेदहा वाजता योगेंद्र यादव यांच्या 'लोकतंत्र की रक्षा के सामने चुनौतीया' भाषणाने संमेलनाचा प्रारंभ झाला.

योगेंद्र यादव म्हणाले,' लोकशाहीत फक्त संख्या महत्वाची नाही, तर समुदाय महत्वाचा आहे.या वेळच्या निवडणुका हातातून गेल्या तर संविधान शिल्लक राहणार नाही. यावेळचे संकट आणीबाणी पेक्षा गंभीर आहे. संविधानातील मूलभूत विचारांवर सुनियोजित आणि अभूतपूर्व हल्ला होत आहे.

आत्ताच्या तथाकथित राष्ट्रवादाचा उगम न्यूनगंडातून आला आहे. शील, करुणा मानणाऱ्या भारताच्या स्वधर्मावर हल्ला झाला आहे. सत्तेत बसलेले लोकच प्रजासत्ताक तोडण्याचा प्रयत्न करीत आहेत, असा आरोप योगेंद्र यादव यांनी केला. आगामी ४ महिने फक्त निवडणुका जिंकण्याचे काम करावे लागेल. आपले भवितव्य पणाला लागले आहे. देश, संविधान वाचवले पाहिजे, असेही योगेंद्र यादव यांनी सांगीतले.

संस्कृती, राष्ट्रवाद, धर्म या गोष्टी संघ परिवाराच्या तावडीतून सोडवून खरा भारत घडवला पाहिजे. संविधानाला संसद, सर्वोच्च न्यायालय वाचविणार नाही, आपल्याला ते वाचवावे लागणार आहे, असेही त्यांनी सांगितले दोन दिवस विचार परामर्श, मुक्त संवाद, प्रश्नोत्तरे यावषी लोकसभा निवडणूक होण्याची शक्यता असल्याने नागरिकांना पुरेशा माहितीवर आधारित, विचारपूर्वक आणि निर्भय मतदान करता येणे, हे लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी आवश्यक आहे. लोकशाही रक्षणाच्या तातडीच्या प्रश्नावर विचार करण्यासाठी हे विचारवेध संमेलन आयोजित करण्यात आले आहे. योगेंद्र यादव, तुषार गांधी, डॉ. राम पुनियानी, डॉ.कुमार सप्तषी, निरंजन टकले, हरीष सदानी, सुनीती सु.र., अजित रानडे, संदीप बर्वे आणि अन्य मान्यवर दोन दिवस विविध सत्रात मार्गदर्शन करणार आहेत.

शनिवारी ६ जानेवारी रोजी सकाळी साडेदहा वाजता योगेंद्र यादव यांच्या 'लोकतंत्र की रक्षा के सामने चुनौतीया' भाषणाने संमेलनाचा प्रारंभ झाला. साडेअकरा वाजता 'लोकशाही खच्चीकरणाचे जागतिक प्रयत्न' या विषयावर अरविंद वैद्य यांचे व्याख्यान होईल. १२ वाजता सुनीती सु.र.यांचे 'लोकशाही रक्षणासाठी लोकांचे धडे' या विषयावर व्याख्यान होईल. पावणे दोन वाजता 'माध्यमांचे स्वातंत्र्य आणि लोकशाही' विषयावर अलका धुपकर संवाद साधतील. राही श्रुती गणेश या 'शिक्षण संस्थांना फॅसिस्टांची मगरमिठी ' विषयावर माहिती देतील. साडे तीन वाजता 'मुस्लिम मागासवगीय आणि लोकशाही रक्षण 'या विषयावर तमन्ना इनामदार बोलणार आहेत. ४ वाजता प्रियदशी तेलंग हे 'लोकशाहीसाठी दलित संघटन' विषयावर व्याख्यान देतील. पावणे पाच वाजता वसुधा सरदार या 'दारूममुक्तीसाठी चळवळ उभारणी' या विषयावर तर प्रभात सिन्हा हे 'माणदेशी चॅम्पियन्स' विषयावर माहिती देतील. सव्वा सहा वाजता 'हू किल्ड गांधी' माहितीपट दाखविला जाईल आणि तुषार गांधी यांच्याशी चर्चा केली जाणार आहे.

रविवार, ७ जानेवारी या संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी सव्वादहा वाजता समूहगीतांनी प्रारंभ होईल. साडेदहा वाजता 'सद्भावना मिशन' या विषयावर डॉ. राम पुनियानी मार्गदर्शन करतील. 'लोकशाही रक्षण' या विषयावर निरंजन टकले यांचे व्याख्यान होईल. १२ वाजता 'स्त्रीवादाच्या संदर्भात लैंगिक हक्क संरक्षण' या विषयावर हरीश सदानी हे संवाद साधतील. पाऊण वाजता 'संविधान प्रचार चळवळीचा अनुभव' विषयाची माहिती संदीप बर्वे देतील. दुपारी सव्वा दोन वाजता 'स्थानिक स्वराज्य संस्थातील महिला प्रतिनिधींचे सक्षमीकरण' या विषयावर भीम रासकर माहिती देतील. पावणे तीन वाजता याच विषयवार नीती दिवाण हिंदीतून माहिती देतील. सायंकाळी ४ वाजता 'लोकशाही बळकटीकरणासाठी सामाजिक सलोखा' या विषयावर अजित रानडे यांचे व्याख्यान होईल. सव्वा पाच वाजता 'लोकशाही रक्षणाच्या लढ्याची दिशा' विषयावर डॉ. कुमार सप्तषी मार्गदर्शन करतील. सहा वाजता सरिता आवाड संमेलनाचा समारोप करतील.

सातारा, सांगली, सोलापूरचा पाणीप्रश्न सुटणार

पुणे : टेंभू उपसा सिंचन योजनेसाठी तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेंतर्गत ७३७०.०३ कोटी रुपयांच्या निधीला मान्यता देण्यात आली आहे. या निधीमुळे सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांतील दुष्काळग्रस्त भागातील सिंचनाचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर सुटण्यास मदत होणार आहे.

राज्य सरकारच्या शासन निणर्यानुसार महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत कृष्णा नदीवरील टेंभू गावाजवळ बंधारा बांधून विविध टप्प्यांद्वारे २२ अब्ज घनफूट पाण्याचा उपसा करून सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यातील सात दुष्काळग्रस्त तालुक्यांतील ८०,४७२ हेक्टर क्षेत्राला पाणी देण्याची ही योजना होती. पण, या प्रकल्पालगतच्या आणि भौगोलिकदृष्ट्या उंचावरील भाग पाण्यापासून वंचित होता.

या क्षेत्राला पाणी देण्याच्या प्रस्तावाला सप्टेंबर २०२३मध्ये अंतिम मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार आठ अब्ज घनफूट पाणी वापरास मान्यता देण्यात आली होती. हे अतिरिक्त पाणी टेंभू विस्तारित टप्पा क्र. सहा अ आणि ब पळशी उपसा सिंचन योजना, माण व खटाव उपसा सिंचन योजना, टप्पा क्रमांक पाच, बेवनूर वितरिका, कामत गुरुत्व नलिका या कामांचा नव्याने समावेश करून टेंभू योजनेचा विस्तार तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार होणार आहे.

या अतिरिक्त पाणी वापरामुळे सिंचनापासून वंचित असलेल्या एकूण ९४ गावांसाठी पाणी उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. या विस्तारित योजनांसाठी एकूण ३० अब्ज घनफूट पाण्याचा वापर नियोजित आहे. या विस्तारित योजना कार्यान्वित झाल्यास एकूण १,२१,४७५ हेक्टर क्षेत्रास लाभ होणार आहे. हे क्षेत्र सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी भागातील आहे. एकूण ७३७०.०३ कोटी रुपयांमधील प्रत्यक्ष कामासाठी ६,७०८,४८ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत, तर आनुषंगिक खर्चासाठी ६६१.५५ कोटी रुपयांचा वापर नियमानुसार करण्याचा आदेश देण्यात आला आहे.

चला.. कर्जे काढू या!

भागा वरखडे

सरत्या वर्षाच्या अखेरच्या सोमवारी भांडवली बाजार उसळण्याची शक्यता असताना आर्थिक इशाऱ्यांची जाणीव करून देणे शहाणपणाचे नाही; हे खरे. पण त्यास इलाज नाही. विशेषतः आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारखी संघटना जेव्हा भारताच्या वेगाने वाढत्या सावभौम कर्जाविषयी- म्हणजे सरकारने घेतलेल्या कर्जाविषयी- इशारा देत असेल तर त्याची दखल न घेणे व्यवसायाशी प्रतारणा करणारे ठरेल. या इशाऱ्यांची दखल घेणे आणखी एका कारणासाठी इष्ट ठरते. कारण हीच नाणेनिधी संघटना जेव्हा भारताविषयी बरे काही बोलते तेव्हा आपले राज्यकर्ते त्या कौतुकाच्या माळा गळ्यातून काढण्यास तयार नसतात. भारतास वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असे ही संघटना वा जागतिक बँक यांपैकी कोणी म्हटले रे म्हटले की आपणास कोण स्फुरण चढते. मग समाजमाध्यमी अर्थवटराव ही वक्तव्ये जमेल तितकी ह्यव्हायरलह्ण कशी करता येईल या प्रयत्नांस लागतात. त्यांत त्यांचीही चूक नाही म्हणा. ह्यवरिष्ठ सांगतील ते ऐकायचेह्ण असे संस्कार बालवयातच झाले की तेच आयुष्यभर सवयीचे होते. त्यामुळे वरिष्ठांस जे जे अप्रिय त्याकडे दुर्लक्ष करणे ओघाने आलेच. या अशांची संख्या वाढती असल्याने नाणेनिधीने दिलेल्या इशाऱ्याकडे लक्ष वेधणे आवश्यक ठरते.

भारत सरकारच्या डोक्यावरील कर्ज झपाटयाने वाढत असून लवकरच त्याचा आकार देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाइतका होईल, असा इशारा नाणेनिधीचा वार्षिक अहवाल देतो. नाणेनिधीच्या सदस्य देशांशी झालेल्या करारानुसार ही संस्था वेळोवेळी संभाव्य आर्थिक आव्हानांची कल्पना देत असते. सदर इशारा हा त्या संदर्भातील अहवालाचा भाग आहे. हा इशारा देणारी व्यक्ती भारताविषयी असूया असलेली कोणी गौरवणीय नाही, हे लक्षात घेतलेले बरे. अर्थात सांप्रति सरकारवर कोणतीही आणि कितीही रास्त टीका करणारी व्यक्ती ही देशद्रोही ठरवली जात असल्याने नाणेनिधीवरील बंदीची मागणी पुढे येणारच नाही; असे नाही. तो धोका पत्करून नाणेनिधी हा इशारा देते त्यावरून त्याचे गांभीर्य लक्षात यावे. देशाच्या डोक्यावरील कर्ज सन २०२८ पर्यंत सकल राष्ट्रीय उत्पन्नाइतके होईल हे आणीबाणीकालीन भाकीत आहे, असेही नाणेनिधी लगेच स्पष्ट करते. याचा अर्थ असा की जागतिक अर्थव्यवस्थेसमोर सध्याची आव्हाने अधिक गहिरी झाली तर या परिस्थितीस सामोरे जाण्यासाठी देशोदेशांस विविध उपाय योजावे लागतात. कर्ज काढणे हा त्यातील एक. या कर्जात अचानक काही कारणांनी वाढ झाल्यास हे कर्ज १०० टक्क्यांवर जाईल, असा नाणेनिधीच्या इशाऱ्यांचा अर्थ. आंतरराष्ट्रीय पातळीवर अथर्संकटाइतकेच, किंबहुना त्यापेक्षाही अधिक मोठे आव्हान आहे ते पर्यावरण बदलाचे. नाणेनिधीचा अहवाल हे नमूद करतो. या पर्यावरणीय बदलांमुळे सध्याच जे उत्पात होत आहेत ते अधिक मोठया प्रमाणावर होऊ लागल्यास- आणि ते तसे होतील असे दिसत असताना- निर्माण होणाऱ्या परिस्थितीस सामोरे जाण्यासाठी सरकारांस अधिक खर्च करावा लागेल. या अशा आकस्मिक खर्चाची तरतूद पुरेशी नाही. अशा तरतुदीशिवाय मोठे खर्च कारण उद्भवल्यास व्यक्तीप्रमाणे देशांसही कर्जे घेण्याखेरीज पर्याय राहात नाही. नाणेनिधीचा अहवाल याचीच जाणीव करून देतो.

तो काहीसा टीकात्मक असल्याने आपण त्यासाठी या संघटनेस फटकारणे ओघाने आलेच. वास्तविक हा अहवाल भारतीय अर्थव्यवस्थेविषयी चार शब्द बरेही बोलतो. त्या जोडीने या अर्थव्यवस्थेसमोरील आव्हानांचा उल्लेख करताना हा इशारा ही संस्था देते. आपणास तितकीही टीका सहन होत नसल्याने या अहवालावर तीव्र प्रतिक्रिया दिली जाते. खरे पाहता तीनच महिन्यांपूर्वी, ऑक्टोबरात, आपल्या अथर्मंत्री निर्मला सीतारामन यांनी आपण देशावरील कर्ज कसे कमी करता येईल याबाबतच्या उपायांच्या शोधात असल्याचे म्हटले होते. या संदर्भात उगवत्या अर्थव्यवस्थांनी काय काय मार्ग चोखाळले याचा आपण अभ्यास करीत असल्याचेही त्या म्हणाल्या. म्हणजे देशावरील वाढत्या कर्जाच्या संकटाची जाणीव अथर्मंत्र्यांनाही आहे. पण अन्य कोणी तेच म्हटले की आपण फुरंगटणार! केंद्र सरकारनेच प्रसृत केलेल्या सांख्यिकीनुसार ३१ मार्च २०२३ या अर्थवर्षाच्या अखेरीस भारत सरकारच्या डोक्यावरील कर्ज १५५ लाख ६० हजार कोटी रुपयांहून अधिक आहे. (१५५.६ ट्रिलियन). हे सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या साधारण ५८ टक्के इतके होते. केंद्राच्या डोक्यावरील कर्ज हा एक भाग. त्याच वेळी आपली विविध राज्य सरकारेही कर्जाच्या ओझ्याखाली पिचू लागलेली आहेत ही बाबदेखील तितकीच महत्त्वाची ठरते. यात योगायोगाची बाब म्हणजे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी केंद्राच्या डोक्यावरील कर्जाबाबत इशारा देत असताना आपली रिझर्व्ह बँक राज्यांवरील कर्जाचे वास्तव समोर मांडत होती. ते अधिक चिंताजनक म्हणायला हवे.

देशातील एकूण ३३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश प्रशासनांवरील कर्जे त्यांच्या उत्पन्नाच्या मानाने अधिक आहेत. त्यातही १२ राज्ये अशी आहेत की त्यांची वित्तीय व्यवस्था तातडीने लक्ष घालावे अशी नाजूक आहे. अरुणाचल प्रदेश, बिहार, गोवा, हिमाचल प्रदेश, केरळ, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, पंजाब, राजस्थान आणि पश्चिम बंगाल या राज्यांचे वित्तीय व्यवस्थापन तोळामासा असल्याचे रिझर्व्ह बँकेचा अहवाल सांगतो. यातील केरळची परिस्थिती त्यातल्या त्यात बरी. कारण त्या राज्यात पर्यटन आणि परदेशस्थ केरळींकडून येणाऱ्या निधीचा ओघ भरभक्कम आहे. पण बाकी राज्यांच्या वित्तीय व्यवस्थापनाबाबत बरे बोलावे असे काहीही नाही. खरे तर केरळप्रमाणे गोवा राज्यास या दोन्ही घटकांचे तितकेच सशक्त वरदान लाभलेले आहे. पण वित्त व्यवस्थापनाच्या नावे गोव्याची बोंब. खरे तर या राज्याची लोकसंख्या १२ लाखांच्या आसपास. म्हणजे ठाणे शहरापेक्षाही कमी. पण त्या राज्यावरील कर्ज ३१ हजार कोटी रुपयांहूनही अधिक. गेल्या दोन दशकांत या राज्यावरील कर्जाचा बोजा तब्बल ६१८ टक्क्यांनी वाढल्याचे हा अहवाल दर्शवतो. कजर्वाढ धोकादायक असलेल्या राज्यांच्या यादीत उत्तर प्रदेशचा समावेश नसेल. पण तरी त्या राज्यावरील कर्ज त्या राज्याच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३० टक्क्यांपर्यंत गेले आहे. आजघडीला या कर्जाची रक्कम ७ लाख १० हजार कोटींहून अधिक आहे आणि हे प्रमाण २८ टक्क्यांपर्यंत आणण्याचा निर्धार त्या राज्याचे मुख्यमंत्री व्यक्त करतात. पंजाबची परिस्थितीही अशीच गंभीर. नुकतेच तेलंगण राज्यात नवीन सरकार सत्तेवर आले. आल्या आल्या या राज्याच्या अथर्मंत्र्यांनी आपल्या तिजोरीचे वास्तव जनतेसमोर मांडले. विविध सरकारी योजना, अनुदाने आदींमुळे ही तिजोरी किती झपाटयाने रसातळास गेली हे त्यावरून लक्षात येते. तरीही नवे सरकार आपल्या जनप्रिय, लोकानुनयी योजना राबवणार आहेच. आणि आगामी वर्ष तर निवडणुकांचे. तेव्हा आर्थिक शहाणपणास सामुदायिक सोडचिठ्ठी दिली जाणार हे उघड आहे. महासत्ता होऊ पाहणारा हा देश निम्म्याहून अधिक म्हणजे ८० कोटी नागरिकांस मोफत धान्य देतो आणि त्याच वेळी श्रीमंत देशांच्या पंगतीत जाण्याचे स्वप्न पाहतो. कहर म्हणजे या दोहोंतील विसंवाद लक्षातही येणार नाही इतका समाजविवेक-मांद्यग्रस्त! तेवम आगामी वर्षात ही कर्जे अधिक जोमाने काढली जातील; हे निश्चित.

घरात एखादी मुलगी असती तर ...

(भाग 3)

मधुमती? हो. तिचे नाव मधुमती आहे . सकाळपासून आपल्याच घरी आहे ती . घरी जाण्याचे नावच घेत नाही आवडलं असेल तिला आपले घर बर जयदेव कालच्या पावसामुळे आपल्या तुळशी वृंदावनाला मोठी चीर पडली आहे. तू जरा सिमेंट भरून टाक त्यात हो टाकतो. त्या दिवशी अचानक आलेली मधुमती गेले चार दिवस जहागीरदारांकडे राहत होती . घरात सगळ्यानाच प्रश्न पडला होता की ही नक्की कोण आहे , आपल्या घरात का आली , कशी आली . पण उत्तरे काही मिळत नव्हती . कारण मधुमतीला काही विचारले तर ती कोड्यातच बोलायची . रोजच्या स्वप्नामुळे आणि मधुमतीसारख्या अनोळखी मुलीने आपल्या घरात राहतेय . यामुळे सुमतीबाई खूप चिडल्या होत्या . त्यांनी ठरवले होते की आज मधुमतीला जाब विचारायचा की तू कोण आहेस ? कुठून आली ते ? आमच्याघरी का आली ते ?₹ तू कोण आहेस? जेवायला बसल्या बसल्या सुमतीबाईंनी विचारले. मी मुलगी आहे ₹₹ अगं हो पण तुझे नाव गाव काय आहे? तुझे आई वडील कुठे आहेत? माहिती नाही तू कुठे राहतेस? इथेच राहते इथेच म्हणजे कुठे? याच घरात काहीही बोलू नकोस. इथे राहतेस तर इतके दिवस कुठे होतीस ? मध्येच वसू विचारते इतके दिवस म्हणजे. गेली अनेक वर्षे मी याच घरात राहतेय. पण माझी साधी आठवण देखील कुणी काढली नाही.

म्हणजे? कौस्तुभ हे बघ आता मला खरे काय ते सांग, उगीच मला छळू नकोस, तू कोण आहेस? सुमती बाई चिडून विचारतात ₹मी घरची मुलगी आहे. मी गेली अनेक वर्षे याच घरात राहतेय. पुन्हा तेच? खरे सांग नाहीतर हाकलून देईन घरातून सुमतीबाई तुम्ही मला घरातून हाकलून दिले तरीसुद्धा 'मी जाणार नाही. एकदा तुम्ही मला तुमच्या आयुष्यातून, घरातून दिले होते . त्यावेळी मी गेले होते. माझा नाईलाज होता. त्यावेळी मी गेले होते .पण आता नाही. आता मी कधीच जाणार नाही. मला बोलावून घेतले आहे . हे माझे पण घर आहे. मधुमती आत रडत जाते. रडवले ना तिला काही गरज होती का? तिला आजपासून कुणी काही प्रश्न विचारायचे नाहीत . तिला जितके दिवस आपल्याकडे राहायचे असेल तितके दिवस ती राहील जयदेव आणि कायमची राहिली तर ... सुमती बाई राहू दे तिला. मी सांभाळेन तिला माझी मुलगी समजून . जसे अनिरुद्ध कौस्तुभ तशीच मधुमती ₹ जयदेव ठणकावून सांगतो . मधुमती लवकरच जहागीरदार यांच्या घरात रमून गेली . जणू काही ती या घरचीच मुलगी आहे . जयदेव कौस्तुभ अनिरुद्ध सगळ्यांनाच तसाही सवय झाली . वसूलाही मधुमतीची सोबत झाली. अपवाद फक्त सुमतीबाई चा होता . त्यांना पटतच नव्हते कि एक अनोळखी मुलगी अपल्या घरात राहतेय ते . त्या सतत तिचा रागराग करायच्या.

रात्री कौस्तुभ पुन्हा कथा लिहायला बसतो.

परशुराम बेपत्ता होऊन दोन महिने झाले होते. गावात कुणी म्हणायचे परशुराम पाणयात वाहून गेला तर कुणी म्हणायचे तो गाव सोडून गेला. त्याचे असे घर सोडून जाण्याने रावसाहेब आजारी पडले. या सगळ्याचा कावेरीवर परिणाम झाला. ती कुणाशीच बोलेनाशी झाली. एकटी एकटी राहू लागली.

त्या दिवशी दुपारी वाड्यात कुणी नसताना सगळ्या बायका कावेरीच्या खोलीत आल्या .कावरी खिडकीतून बाहेर बघत होती . तिचे कुठेच लक्ष नव्हते . ती तिचे सगळे काही गमावून बसली होती. तिची मुलगी अगदी दोन तीन दिवसाच्या असताना त्यांना नदीत फेकून देण्यात आले . घराण्याला वारस हवा होता . मुलगी ओझे वाटायची . मुलीला शोधायला म्हणून घराबाहेर गेलेला कावेरीच्या नवरा परशुराम अजून घरी आला नव्हता. कावेरी ही तुझी नथ बघ ना, किती छान आहे हिरेजडित आहे परशुची आई आणि तोडे मला फार आवडले. कावेरीची आणि माझे बांगडीचे माप अगदी सारखे आहे म्हणून तोडे आणि बांगड्या मला हव्यात परशुची बहीण आणि अंगठी मला हवी. आधीच सांगतेय परशूची वहिनी बायका काहीतरी ठरवून आलेल्या दिसत होत्या. कावेरी, आता ह्या दागिन्यांचा तुला काही उपयोग नाही. तसेही दागिन्याची तुला फारशी हौस नाही . तुज्या वडिलांनी मोठ्या हौसे ने तुला हे डबाभर दागिने दिले , पण तू काय आता हे दागिने वापरणार नाही . त्यापेक्षा आम्ही सगळ्याजणी वाटून घेतो. आत्याबाई₹ मग देतेस ना, दागिने.



असे म्हणत परशूच्या आईने दागिन्यांचा डबा उघडला आणि एकेक दागिना वाटू लागते. पाटल्या, बांगडया, तोडे, अंगठी, ठुशी, चिंचपेटी, चांदीची वेणी, मेखला , पैंजणे असे अनेक दागिने होते. ते बघून बायकांचे डोळे दिपून गेले होते . बायका एकेक दागिना घालून बघत होत्या . तसा त्यांचा कलकलाट वाढला. त्या आवाजाने कावेरी भानावर आली . परशूच्या बहिणीच्या हातात बांगड्या पाहून ती ओरडते . अंगावर धावून जाते. ह्या माज़्य बांगड्या आहेत. मला माज़्या बांगड्या द्या अगं पण आधी बांगड्या द्या. मला माझे सगळे दागिने द्या.

अग तुला ह्या दागिन्यांचा काही उपयोग नाही मी माझे सगळे दागिने माज़्या मुलीला देणार आहे. तिच्या लग्नात. तुझी मुलगी नाहीये आता. ती गेली नदीत वाहून . समजलं . नाही. माझी मुलगी इथचं आहे . यायचं वाड्यात आहे . ती कुठेच गेली नाही. आहेस ना ग राणी , बोल ना राणी माझी . बोल ना मी आहे म्हणून. असे बडबडत कावरी बाहेर अंगणात येते . तिच्या पाठोपाठ सगळ्या बायका येतात. अग राणी बोल ना, हे सगळे म्हणतात तू नाहीस म्हणून. पण तू आहेस ना . माज़्या स्वप्नात आली होती . मला सांगून गेली आहे ती परत येणार आहे . माझी मुलगी परत येणार आहे . माझी मुलगी परत येणार आहे . मी शाप देते जेव्हा जेव्हा ह्या घरात मुलीला कुणी साद घालेल . तिची आठवण काढेल . तिला मायेने , प्रेमाने बोलावाल . तेव्हाच ती येईल . तो पर्यंत या वास्तूत मुलगी जन्माला येणार नाही . लक्षात ठेवा . माझा शाप आहे या वास्तूत मुलगी जन्माला येणार नाही.

....(क्रमशः)

पुणे वैभव सौ. प्राजक्ता प्रणव देव
पिरंगुट , पुणे.मो.-

पत्रकार दिनी मोफत वैद्यकिय तपासणीला ठाणेकरांचा चांगला प्रतिसाद

ठाणे : आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी रोजी 'दर्पण' या वृत्तपत्राची सुरुवात केल्याने हा दिवस 'पत्रकार दिन' म्हणुन साजरा होतो. या पत्रकार दिनाचे औचित्य साधुन ठाणे महापालिका आणि जिल्हा माहिती कार्यालय यांच्या सहकार्याने ठाणे जिल्हा पत्रकार संघ, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाच्या पुढाकाराने आज (शनिवार 6 जानेवारी) महापालिकेतील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात मोफत वैद्यकीय तपासणी शिबीर आयोजित केले होते.आधार रेखा प्रतिष्ठान, कॅन्सर पेशंट एड असोसिएशन, मुंबई यांच्या सहकार्याने पार पडलेल्या या शिबिरात अद्ययावत पध्दतीने १२१ जणांची मोफत वैद्यकिय तपासणी करण्यात आली.

ठामपा मुख्यालयात शनिवारी सकाळी १० वा. या ककरोग तपासणी शिबिराचा प्रारंभ ठामपा आयुक्त अभिजीत बांगर यांच्या हस्ते दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. याप्रसंगी,ठामपा अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, ठाणे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय पितळे,ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष आनंद कांबळे, ज्येष्ठ संपादक दीपक दळवी, दिलीप शिंदे, जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, आधार रेखा प्रतिष्ठानच्या रश्मी जोशी आदीसह पत्रकार बांधव उपस्थित होते.

या ककरोग तपासणी शिबिरात पत्रकारांची रक्त तपासणी, नाक-कान- घसा तपासणी,स्त्रीरोग तज्ञांकडून स्त्रियांची तर तज्ञ फिजीशियनकडून पुरुषांची तपासणी आणि मुख्यत्वेः व्यसनासंबधी जागरूकता करण्यात आली. शिबिरातील प्रत्येक तपासणीचे रिपोर्टस लाभाथीना देण्यात येणार आहेत.

यावेळी महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी पत्रकार संघांने दोन्ही दिवस विधायक उपक्रम राबवुन उल्लेखनीय कामगिरी केल्याचे सांगुन पुढील काळात ठाणे महापालिकेतर्फेही महिला पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांची मोफत मॅमोग्राफी तपासणी करण्याच्या सुचना दिल्या.

आज झालेल्या आरोग्य तपासणी शिबिरात ठाण्यासह कल्याण शहापूर मुरबाड येथील पत्रकारांनी सहभाग घेतला. यावेळी महापालिकेचे माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर, प्र. उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर, उपस्थित होते. ठाणे महापालिकेने केलेल्या सहकार्याबद्दल पत्रकार संघाने आयुक्त अभिजीत बांगर यांचे आभार मानले.

वर्तक नगर पोलीस स्टेशनच्या वतीने रेझिंग डे संपन्न

पोलिस आणि नागरिक यांच्यातील दरी कमी व्हावी याकरिता ठाणे पोलिसांच्यावतीने अभिनव शक्कल लढविण्यात आली आहे. विद्याथी दशेपासून विद्यार्थ्यांना पोलिसांच्या कार्यप्रणाली आणि हत्याराची माहिती व्हावी, या उद्देशाने वर्तक नगर पोलीस स्टेशनच्या वतीने आज शुक्रवार ५ जानेवारी रोजी रेझिंग डे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्कार शिवाई विद्यालय शिवाई नगर ठाणें च्या विद्यार्थ्यांना वर्तकनगर पोलीस स्टेशन मधील कामकाज,हत्यार,वायलेस कम्युनिकेशन आणि जेल बाबत माहिती देण्यात आली आहे. सदर वेळी पो.नि./ संतोष गायकर (गुन्हे) व सपोनि/ सागर गोंटे, पो. हवा/1846 जितेंद्र बिरारी व गोपनीय कमर्चारी याच्यासह संस्कार शिवाई विद्यालयाचे श्रीमती साधना कांबळे, मुख्याध्यापिका, प्राथमिक व माध्यमिक, जुनियर कॉलेज, श्री. रमीया वाडकर, एडमिस्ट्रेशन प्रभारी याच्यासह 6 ते 7 शिक्षक वर्ग व 120 विद्याथी व विद्याथिनी उपस्थित होते.

बंदूक स्वच्छ करताना गोळी झाडली गेल्याने तिघे जखमी

ठाणे : वागळे इस्टेट येथील रोड क्रमांक २८ भागात बंदूक स्वच्छ करत असताना गोळी झाडली गेल्याने बंदूकधारकासह तिघेजण जखमी झाले. मोहम्मद शेख (५०), विपीन जयस्वाल (२१) आणि राहुल जयस्वाल (२३) अशी जखमींची नावे आहेत. रात्री उशीरापर्यंत याप्रकरणी श्रीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. रोड क्रमांक २८ भागातील राम नगर परिसरात चामुंडा फॅब्रिडकेटर्स नावाची कंपनी आहे.

ही कपंनीचे मालक मोहम्मद शेख असून त्यांच्या कंपनीत विपीन आणि राहुल कामगार आहेत. शनिवारी रात्री कंपनीमध्ये मोहम्मद हे बंदुक स्वच्छ करत होते. त्यावेळी मोहम्मद यांच्याकडून चुकून गोळी झाडली गेली. ही विपीन आणि राहुल यांच्या हाताला लागली. तर, मोहम्मद यांच्या तळहाताला दुखापत झाली. घटनेची माहिती श्रीनगर पोलिसांना मिळाल्यानंतर उपायुक्त अमरसिंग जाधव यांच्यासह श्रीनगर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. जखमींना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मोहम्मद याच्याकडे बंदूकीचा परवाना आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

महाबळेश्वरमध्ये अनाधिकृत बांधकामांवर हातोडा

भिलार, भौसे, खिंगर परिसरात पोलीस बंदोबस्तात कारवाई सुरू

पाचगणी : अति संवेदनशील क्षेत्र (इको सेन्सिटिव्ह झोन) म्हणून घोषित असणाऱ्या महाबळेश्वर तालुक्यात अनाधिकृत बांधकामे नेहमीच चर्चेचा विषय बनून राहिलेला आहे. भिलार, भोसे, खिंगर येथील अनाधिकृत बांधकामावर आज अचानक एकाच वेळी जिल्हा प्रशासनाने आज सकाळी साडेपाचच्या सुमारास हातोडा उगारला. महाबळेश्वर तालुक्यातील पाच ठिकाणी ही कारवाई झाली असून यामध्ये भिलार येथील संकला, भोसे येथील प्रवीण छेडा, खिंगर येथील खंबाटा अशा बांधकामावर आज मोठ्या फौज फाट्यासह प्रसानाने बुलडोझर फिरवला आणि बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली. जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या मार्गदर्शनाखाली अनधिकृत बांधकामावर ही कारवाईची

मोहीम आज पहाटे नियोजनबध्द रित्या सुरू झाली. यावेळी वाईचे प्रांताधिकारी राजेंद्रकुमार जाधव, महाबळेश्वर तहसीलदार तेजस्विनी पाटील, वाई तहसीलदार सोनाली मेटकरी, खंडाळा तहसीलदार विजय पाटील, महाबळेश्वर, पाचगणी नगरपालिकेचे कमर्चारी, वैद्यकीय टीम, महसूल अधिकारी तालुक्यातील सर्व मंडलअधिकारी व तलाठी आदी घटनास्थळी कारवाई वेळेस उपस्थित होते. या ठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्त ही तैनात करण्यात आला होता. दहा ते बारा जेसीबी आणि फॉकलन या मशिनच्या साह्याने अनधिकृत बांधकामाने उध्वस्त करण्याचे काम आज सकाळपासून चालू आहे. ही अनधिकृत बांधकामे पाडण्याची मोहीम नियोजनबध्द रित्या राबवली गेली. सर्व फौजफाटा काल पासूनच पांचगणीत दाखल झाला होता. त्यामुळे कारवाई होणार हे पक्के झाले होते. सकाळी कुणालाही समजण्याआधी पहाटेच सर्व यंत्रणा ठरलेल्या बांधकामांवर पोहोचली आणि अचानक या मोहिमेने वेग घेतला आणि सकाळ होताच यातील काही बांधकामे जमिन दोस्त करण्यात आली. या मोहिमेची माहिती गुप्त ठेवण्यात आली होती. आज सकाळी पहाटे अचानक मोहीम सुरू करण्यात आली. त्यामुळे एकच गोंधळ उडाला होता. याविषयी अधिक माहिती घेण्याचा प्रयत्न करण्यात आला मात्र अधिकाऱ्यांचे मोबाईल बंद असल्याचे निदर्शनास आल्याने माहिती मिळू शकली नाही. या कारवाईने अनेक बांधकाम व्यवसायिक व बांधकाम मालक यांचे धाबे दणाणले आहेत. यामुळे स्थानिक भूमिपुत्र धास्तावले आहेत तर ही कारवाई मोठ्या धनिकांवर होणार की, सामान्य नागरिकाना ही यात भरडले जाणार याबाबत चर्चा सुरू आहेत.

प्रशासनाची अनाधिकृत बांधकामाविरुद्ध मोहीम स्वागतार्ह असली तरी किती अनाधिकृत बांधकामांवर कारवाई होणार..? याची माहिती नाही. त्यामुळे ही मोहीम कायम चालू राहणार की मोजक्याच बांधकामांवर कारवाई होऊन थांबणार याबाबत संशय व्यक्त होत आहे.

अनाधिकृत बांधकामावर कारवाईच्या आदल्या रात्री पाचगणी येथे फौज फाटा सज्ज ठेवण्यात आला होता. मात्र याची पुसटशीही कल्पनाही कोणास लागू दिली नव्हती. अतिशय गुप्तपणे मोहीम राबविण्यात आली आहे. या अनाधिकृत बांधकामावर प्रशासनाने जेसीबी, फॉकलन साहाय्याने अनाधिकृत इमारतीचे बांधकाम उदध्वस्त करण्याचे काम सुरू केले आहे.

जितेंद्र आव्हाडांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

मावळ तालुका भाजपची मागणी

वडगाव मावळ : माजी मंत्री व राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी प्रभू श्रीरामचंद्रांविषयी केलेल्या कथित अवमानकारक विधानामुळे मावळ तालुक्यात भाजप कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत.आव्हाड यांच्या विधानामुळे हिंदू धर्मातील शेकडो भाविकांच्या भावना दुखावल्या असून आव्हाड यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी मावळ तालुका भाजपचे तालुकाध्यक्ष दत्तात्रय गुंड यांनी केली आहे.

वडगाव मावळ पंचायत समिती चौकात मावळ तालुका भाजपाचे वतीने निषेध आंदोलन करण्यात आले यावेळी मावळ विधानसभा निवडणुका प्रमुख रविंद्र भेगडे, तालुकाध्यक्ष दत्तात्रय गुंड, वडगाव शहराध्यक्ष अनंता कुडे,माजी सभापती गुलाबराव म्हाळसकर, नगरसेवक प्रविण चव्हाण, सुधाकर ढोरे, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष विनायक भेगडे भाजपा महिलाध्यक्षा सायली बोत्रे,युवा मोर्चा तालुकाध्यक्ष नितिन मराठे,माजी सरपंच नितिन कुडे,महेंद्र म्हाळसकर, विजय जाधव,गणपत बिनगुडे,

आदींच्या उपस्थित पोलिसांना निवेदन देण्यात आले.

सावित्रीबाई फुलेंनी महिलांना लिहायला, वाचायला शिकवले म्हणून पुस्तके देवून महिलांचा सन्मान

हडपसर मधील स्मितसेवा फाउंडेशनचा अनोखा उपक्रम

हडपसर : स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त हडपसर भागातील महिला शिक्षिका, उद्योजिका, सामाजिक कार्यकर्ते यांचा सत्कार सावित्रीबाईनी महिलांना लिहायला वाचायला शिकवले म्हणुन पुस्तके देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. भारतीय जनता पाटीचे महाराष्ट्र प्रदेश ओबीसी मोर्चा महिला अध्यक्षा उज्वला हाके यांच्या हस्ते महिलांचा सन्मान करण्यात आला.यावेळी उज्वला हाके म्हणाल्या की, महिलांनी चुल आणि मुल मध्ये घुरर्फुटुन न जाता चांगले उच्च दर्जाचे शिक्षण घेऊन महिलांनी आपला अर्थिक स्थर उंचावा, यावेळी भाजपा प्रदेश कायर्कारणी सदस्य डॉ पंकज भिवटे , कार्यक्रमाचे आयोजक भारतीय जनता पाटी चे ओबीसी मोर्चा सरचिटणीस ,स्मितसेवा फाउंडेशनच्या संस्थापक

अध्यक्ष स्मिता तुषार गायकवाड यांनी केले होते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर भाजपा महिला मोर्चा प्रदेश संयोजक डॉ उज्वलाताई हाके यांनी आपले विचार मांडले व स्मिताताई गायकवाड जे अविरत कार्य करत आहे त्या कार्याचे कौतुक केले.

यावेळी स्मिता वाघ,सारिका देशमुख, निवेदिता राजगे, सुलभा साळुंखे, रेखा आबनावे, पद्मश्री स्वामी, सुशिला चौरे, अनामिका वाकले, माया शेवकर, अंजली तोपरफे, छाया सायकर, शीला जोगळेकर, वर्षा देशपांडे, सुलभा देशपांडे, तेजश्री भुजबळ,लक्ष्मी शेळके, संध्या कदम, डॉ. पंकज भीवटे, सविता भंडारेकर, सविता खवळे, अलका भिसे, विनिता गायकवाड, चैत्राली खेमकर आदी सावित्रीच्या लेकिंचा शॉल, पुष्पगुच्छ व पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला.

अटल बिहारी वाजपेयी व गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त पंधरवडा सेवेचे आयोजन

माजी नगरसेवक मारुती आबा तुपे यांनी केले वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवड्याचे आयोजन

हडपसर : भारतरत्न माजी पंतप्रधान स्व.अटल बिहारी वाजपेयी यांच्या वाढदिवसानिमित्त व लोकनेते मा.केंद्रीय मंत्री स्व.गोपीनाथ मुंडे, भाजपाचे माजी नगरसेवक मारुती आबा तुपे यांच्या वाढदिवसानिमित्त पंधरा दिवस सेवा आठवडा म्हणून साजरा करण्यात येत आहे. समाजसेवा करत असताना आपले समाजाप्रती असणाऱ्या दायित्वाची जाण असलेल्या मारुती तुपे यांच्या संकल्पनेतून जीवनावश्यक गरजांपासून वंचित असलेल्या समाजातील विविध घटकांना आपण मदत केली पाहिजे यासाठी शालेय विद्यार्थ्यांना दप्तर वाटप, तसेच गरजू व्यक्तींना थंडीपासून संरक्षण करण्यासाठी ब्लँकेट वाटप ,मतिमंद विद्यालयात विद्यार्थ्यांना खाऊ वाटप,

पुणे मनपाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, वृद्धाश्रमात महिलांना वृद्धांना कपड्यांचे वाटप, गो शाळेमध्ये जनावरांना चाऱ्याचे वाटप, वृक्षारोपण, किराणा वाटप, व 25 डिसेंबर रोजी गांधी चौक हडपसर या ठिकाणी भव्य रक्तदान शिबिर, नेत्रचिकित्सा शिबिर व आरोग्य तपासणी शिबिर असे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते.

नागरिकांनी स्वयंस्फूर्तिने रक्तदान शिबिरात मोठ्या संख्येने सहभाग घेतला, देसाई आय हॉस्पिटलच्या माध्यमातून नागरिकांचे नेत्र तपासणी करून गरजूंना मोफत चष्मे वाटप करण्यात आले तसेच पुणे ब्लड बँकेच्या माध्यमातून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सेवा सप्ताह पंधरवड्याचे आयोजन भारतीय जनता पाटी हडपसर विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी कार्यकर्ते तसेच धमवीर शंभूराजे प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष माजी नगरसेवक मारुती आबा तुपे युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून करण्यात आले होते.

विजय सेतुपतीची कतरिना कैफला कौतुकाची थाप

मेरी ख्रिसमस या बहुप्रतिक्षित चित्रपटाची पत्रकार परिषद चर्चेचा विषय ठरली कारण अभिनेत्री कतरिना कैफला तिचा सहकलाकार प्रसिद्ध अभिनेता विजय सेतुपती यांच्याकडून कौतुकाची थाप मिळाली आहे. अष्टपैलू कामगिरीसाठी ओळखल्या जाणाऱ्या विजय सेतुपतीने चित्रपटाच्या सेटवर कैटरीना कैफच्या अपवादात्मक अभिनय कौशल्याबद्दल आणि अतुलनीय व्यावसायिकतेबद्दल प्रशंसा केली.

कतरिनाच्या अभिनय कौशल्याची आणि व्यावसायिकतेची प्रशंसा करताना तो म्हणाला, कतरिनाची काम करण्याची पद्धत पाहून मी थक्क झालो आहे. ती एक उत्तम व्यावसायिक आणि उत्तम अभिनेत्री आहे.

तिच्यासोबत काम करताना खूप आनंद झाला. या पत्रकार परिषदेत नजर तेरी तुफान हे गाणं प्रदर्शित करण्यात आल. प्रख्यात संगीतकार प्रीतम चक्रवती आणि गीतकार वरुण ग्रोव्हर यांनी संगीतबद्ध केलेल हे खास गाणं प्रसिद्ध गायक पापोन यांनी गायलं आहे.

कतरिनाच्या तमिळ पदार्पणासाठी हा चित्रपट उल्लेखनीय ठरणार आहे. श्रीराम राघवन दिग्दर्शित मेरी ख्रिसमस, १२ जानेवारी, २०२४ रोजी हिंदी आणि तमिळ अशा दोन्ही भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. हिंदी मध्ये संजय कपूर, विनय पाठक, प्रतिमा काझमी, टिन्नू आनंद, अश्विनी काळसेकर आणि राधिका आपटे प्रमुख भूमिकेत आहेत. तर तमिळ मध्ये कतरिना आणि विजय सेतुपतीसह राधिका सरथकुमार, गायत्री, षण्मुगराजन, काविन जय बाबू आणि राजेश विल्यम्स दिसणार आहेत. ज्यामुळे स्क्रीनवर डायनॅमिक आणि वैविध्यपूर्ण कलाकार बघायला मिळणार आहे.

नाट्य कलावंतांसोबत पारंपारिक लोककलांनी सजली नाट्य दिंडी

पिंपरी: ढोल, ताशा, लेझीम, गुलाबी फेटे, रांगोळ्यांच्या पायघड्या अन् सर्व कलाकारांच्या उपस्थित १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाची नाट्य दिंडी आज निघाली. नाट्य कलावंतांसोबत पारंपारीक लोक कला असलेल्या वासुदेव, पिंगळा, पोतराज, गोंधळी, दशावतार या लोककलाकारांच्या लोककलेने ही नाट्य दिंडी सजली होती.

ही नाट्य दिंडी पाहण्यासाठी पिंपरी -चिंचवडकरांनी रस्त्याच्या दुतर्फा गदी केली. यावेळी नागरिकांना कलाकारांसोबत सेल्फी काढण्याचा मोह आवरला नाही. नाटक किंवा सिनेमात दिसणारे कलाकार नाट्य दिंडीत दिसल्याने नागरिकांना सेल्फी काढण्याचा मोह आवरला नाही. तसेच अनेकांनी हे सर्व क्षण आपल्या मोबाईलमध्ये रेकॉर्ड केले.

मोरया गोसावी मंदिरा पासून या नाट्य दिंडीला सुरूवात झाली. गांधी पेठ, तानाजी नगर मार्गे ही दिंडी श्री मोरया गोसावी क्रिडा संकुलापर्यंत पोचली. नाट्य दिंडीचे स्वागत लोकांनी खूप उत्साहात केले. नाट्य दिंडीच्या सुरूवातीला अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, नाट्य संमेलनाचे आयोजक भाऊसाहेब भोईर, अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा पिंपरी- चिंचवडचे उपाध्यक्ष कृष्णकांत गोयल, कार्याध्यक्ष राजेशकुमार साकला, ९९ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष प्रेमानंद गज्वी, १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष जब्बार पटेल आणि असंख्य नाट्य कलावंत सहभागी झाले होते.

पिंपरी - चिंचवडकरांची सकाळ ढोल, ताशा अंन लेझीम अन् जय्घोषाच्या आवाजाने झाली. त्यात सकाळच्या वेळी वासुदेव, पिंगळा, गोंधळी, वाघ्या - मुरळी यांच्या सादरीकरणाने नागरिक भारावून गेले होते. ही दिमाखदार नाट्य दिंडी पाहण्यासाठी नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा गदी केली. ठिकठिकाणी थांबून नागरिकांनी या नाट्य दिंडीचा नयनरम्य सोहळा अनुभवला. नाट्य दिंडी आपल्या दारी असा काहीसा अनुभव या रसिकांनी यावेळी अनुभवला.

नाट्यदिंडीमध्ये अभिनेत्री कविता लाड, तेजश्री प्रधान, सुरेखा कुडची, प्रतीक्षा लोणकर, निमिती सावंत,अमृता सुभाष, प्रिया बेर्डे, वर्षा उसगावकर, स्पृहा जोशी, कांचन अधिकारी, शुभांगी गोखले, सुकन्या मोने, सविता मालपेकर तसेच अभिनेता सुशांत शेलार, भारत जाधव, सिद्धार्थ जाधव, चेतन दळवी, संजय मोने, वैभव मांगले, उमेश कामत, संजय खापरे, सुयश टिळक, पुष्कर श्रोत्री, संदीप पाठक यांसह अनेक प्रसिद्ध कलावंत सहभागी झाले.

संगीतकार डॅनियल वेबर याने त्याच्या नव्या गाण्यातून आठवणी ना दिला उजाळा

संगीतकार डॅनियल वेबर याने अलीकडेच मेमरीज या गाण्याच्या रिलीझसह नव्या वर्षात पदार्पण केलं आहे. या बहुआयामी प्रतिभेने केवळ गीत लिहिलं नाही तर संपूर्ण कलात्मक पद्धतीने ते गायलं देखील आहे. त्याचे गायन आणि गिटार कौशल्य यातून दिसून येत. डॅनियल हा एक संगीतकार आहे आणि पूर्वी तो द डिस्स्पॅरोज या बँडचा एक भाग होता. मेमरीज हे गाणं कलाकार म्हणून डॅनियलचा पाचव रिलीज आहे.

मेमरीजने डॅनियल वेबरच्या संगीत कारकिदीत अजून एक व्हिडिओ केली आहे. जेम्स थॉमस यांनी दिग्दर्शित केलेला आणि लॉस एंजेलिसमध्ये केलेला म्युझिक व्हिडिओ हा कमाल आहे. मेमरीज वेगळे ठेवणारी गोष्ट म्हणजे वेबरचा कलात्मक पराक्रमच नाही तर संगीत उद्योगातील हॉलीवूडच्या उल्लेखनीय सहभाग आहे. हॉलीवूडच्या दृश्यातील मोठ्या नावांनी हा ट्रॅक वेबरला आशा आहे की ₹मेमरीज₹ हे प्रेक्षकांच्या मनात कायम राहील.

क्रिती खरबंदा ते नेहा पेंडसे अश्या चार अभिनेत्री ज्यांनी पोल डान्सिंग कलेत आपल प्रभुत्व मिळवल

पोल डान्सच्या कलेमध्ये प्रभुत्व मिळवणाऱ्या तश्या काही खास आणि फार कमी प्रतिभावान अभिनेत्री इंडस्ट्रीत असताना या अभिनेत्रीच काम हे उल्लेखनीय आहे यात शंका नाही. स्टिरियोटाइप तोडून फिटनेस आणि स्व-अभिव्यक्ती म्हणून पोल डान्सवर भर देत त्यांनी स्वतःची प्रतिमा निर्माण केली आहे.

क्रिती खरबंदा: राझ रीबूट, हाऊसफुल ४ आणि तैश या चित्रपटांमध्ये तिच्या अखंड अभिनयासाठी ओळखली जाणारी क्रिती खरबंदा तिच्या पोल डान्स कौशल्यामुळे चर्चेत आहे. अनेक वर्षांपासून ती पोल डान्सचा सराव करत आहे. तिने सोशल मीडियावर तिच्या पोल डान्स चे व्हिडिओ शेयर केले आहेत.

नेहा पेंडसे: प्रसिद्ध भारतीय अभिनेत्री नेहा पेंडसेने तिच्या उल्लेखनीय पोल डान्सिंग साठी अनोखी ओळख मिळवली आहे. ₹ मे आय कम इन मॅडम? या टीव्ही मालिकेतील तिच्या भूमिकांसाठी ती प्रसिद्ध तर आहेच सोबतीला नटसम्राट सारखा दर्जेदार चित्रपट तिने केला आहे. नेहा सोशल मीडिया स्टार म्हणून उदयास आली असून लोकांना पोल डान्सला व्यायाम आणि आत्म-अभिव्यक्ती म्हणून घेण्यास प्रवृत्त करते. अनेक लोकांनी तिचं यासाठी कौतुक देखील केलं आहे. विविध मुलाखतींमध्ये, ती पोल डान्सच्या तिच्या आवडीची चर्चा करते, फिटनेस आणि आत्म-शोधाच्या क्षेत्रात एक प्रेरणादायी व्यक्ती म्हणून तिची स्थिती मजबूत करते.

यामी गौतम: अभिनेत्री यामी गौतम ही



तिच्या विक्की डोनर आणि A Thursday सारख्या तिच्या भूमिकांसाठी प्रसिद्ध आहे. तिने तिच्या पोल डान्सिंग क्षमतेसाठी लक्ष वेधून घेतले आहे. ती काही काळापासून पोल डान्स करत आहे आणि तिने तिच्या सराव सत्राचे व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट केले आहेत. तिच्या पोल डान्सच्या प्रेमाचा उल्लेख अनेक मुलाखतींमध्ये करण्यात आला आहे, जिथे तिने या कला प्रकारातील अडचणी चर्चा केली आहे.

जॅकलीन फर्नांडिसः किक अभिनेत्री जॅकलीन फर्नांडिस वर्षानुवर्षे पोल डान्सचा सराव करत आहे आणि तिने चंद्रलेखा (अ जेंटलमॅनसाठी, सिद्धार्थ मल्होत्राच्या विरुद्ध) आणि हिरीये (रेस ३ साठी, सलमान खानच्या विरुद्ध) या चित्रपटांमध्येही त्याचा समावेश केला आहे. तिने सोशल मीडियावर तिच्या सराव सत्रांचे व्हिडिओ पोस्ट केले आहेत आणि पोल डान्स हे तिचे ₹वर्कआउटचे

आवडते प्रकार₹ म्हणून वर्णन केले आहे. तिची देहबोली बदलण्याचे श्रेयही तिने पोल डान्सला दिले आहे.

पोल डान्स हा प्रकार हल्ली अनेक चित्रपटांमध्ये बघायला मिळतो आणि याची वेगळी जादू पहायला मिळते म्हणून या अभिनेत्री कायम त्यांच्या अनोख्या शैली ने चर्चेत असतात.



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती अभिवादन

हडपसर : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त हडपसर मध्ये अभिवादन करण्यात आले. कै.लक्ष्मीबाई विठ्ठल शिखरे सामाजिक संस्था.यांचे वतीने भारतातील पहिल्या शिक्षिका,मुख्याध्यापिका,स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९२व्या जयंती निमित्त सामाजिक कार्यकर्ते सतीश ससाणे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण संस्थेच्या संचालिका जयश्री शिखरे, संगीता भोसले यांनी केले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष भागूजी शिखरे, उपअध्यक्ष दिनकर सोनवणे, सचिव प्रा.सुरेश भोसले, संस्थेचे संचालक बाळासाहेब शिखरे, राजेश सोनवणे, श्रीहरी गायकवाड, जयश्री शिखरे, संगीता भोसले, दादासाहेब जाधव, जानकु कदम, विलास शेलार, संजय सपकाळ, अजय सकपाळ, मोरे, पुष्पा खरात, स्मिता खरात आदि मान्यवर उपस्थित होते.

नाट्य चळवळीच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र प्रयत्न करावे-उद्योगमंत्री उदय सामंत

पुणे : सांस्कृतिक चळवळीचा भाग म्हणून नाटकाकडे बघताना सर्वांनी नाट्य चळवळीच्या विकासासाठी एकत्र येऊन प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा अध्यक्ष ज्येष्ठ कलाकारांमधून एकमताने ठरविला जावा, अशी अपेक्षाही श्री.सामंत यांनी यावेळी व्यक्त केली.

गणेश कला क्रीडा संकुल येथे आयोजित १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या शुभारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. नाटकाच्या घंटेचे पूजन करून आणि संमेलनाध्यक्षांच्या हस्ते घंटा वाजवून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाला खासदार श्रीनिवास पाटील, ९९ व्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष प्रेमानंद गज्वी, नाट्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ.जब्बार पटेल, नाट्य संमेलनाचे माजी अध्यक्ष सुरेश खरे, दत्ता भगत, गंगाराम गवाणकर, नाट्यपरिषदेचे विश्वस्त शशी प्रभू, अशोक हांडे, मोहन जोशी, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पुणे शाखेचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले आदी उपस्थित होते.

उद्योगमंत्री श्री.सामंत म्हणाले, अनेक देणगीदारदेखील नाट्य चवळवळीला प्रोत्साहन देत आहेत. शासनाकडून मिळणारा निधी नाट्य चवळवळ पुढे नेण्यासाठी पडद्यामागील कलावंतांच्या मदतीसाठी वापरला जावा असा प्रयत्न आहे. स्व. विक्रम गोखले यांचे स्वप्न साकार करण्यासाठी रत्नागिरीचे नाट्य संमेलन होण्यासाठी, वृद्ध कलाकारांसाठी वृद्धाश्रमाचे काम सुरू करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

हिंदी आणि मराठी रंगभूमीत मोठी तफावत दिसून येते. मराठी माणसाने हिंदीतही पुढे जावे यासाठी त्याच्यामागे पाठबळ उभारण्याची गरज आहे. नाट्य निर्मात्यांनी आणि कलाकारांनी नाट्य संमलेनाचे तीन दिवस आपल्या मातृसंस्थेसाठी आहे हे लक्षात घ्यावे आणि प्रेक्षकांच्या इच्छेचाही विचार करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

लोककल्याण प्रतिष्ठाणचे कार्य दिनदशिर्केच्या माध्यमातून प्रत्येकाच्या घरोघरी पोहचते : विकास रासकर

हडपसर : हडपसर भेकराईनगर येथील लोककल्याण प्रतिष्ठानचे कार्य हे नववर्ष दिनदशिर्केच्या माध्यमातून प्रत्येकाच्या घरोघरी घरा पोहचते,

ते पोहचून निरंतर स्मरणात रहाणारे आहे. असे मत श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखान्याचे कार्याध्यक्ष विकास रासकर यांनी तुकाई दर्शन येथे श्री स्वामी समर्थ मंदिरात लोककल्याण प्रतिष्ठाण व पतसंस्थेच्या लोककल्याण दिनदशिर्का चे प्रकाशन सोहळा त्यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी लोककल्याण प्रतिष्ठाण व पतसंस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ होले,कार्याध्यक्ष हरीश्चंद्र कुलकर्णी,उपाध्यक्ष दिलीप भामे,सचिव इंद्रपाल हत्तरसंग, पतसंस्थेचे उपाध्यक्ष अरुण शिंदे,मार्गदर्शक प्रा. एस.टी.पवार,यशोधन रासकर,मच्छिंद्र पिसे,चंद्रकांत वाघमारे,पांडुरंग शेंडे,तुकाराम घोडके,प्रभाकर शिंदे,प्रविण होले,भुषण चव्हाण,मोरेश्वर कुलकर्णी,श्यामकांत पाटिल आनंद पाचागंणेआदि उपस्थित होते.

यावेळी बोलताना लोककल्याण प्रतिष्ठाणचे अध्यक्ष राजाभाऊ होले म्हणाले लोककल्याण दिनदशिर्का मोफत वितरणा बरोबरच प्रतिष्ठाण वर्षभर विविध सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करीत असते.आज लोककल्याण प्रतिष्ठान चे कार्य दिनदशिर्केच्या माध्यमातून सर्वांसमोर घराघरात पोहचते आमचे कार्य ,समाजसेवा हे एक दिवसापूरते नसून वर्षभर चालते असे होले म्हणाले.

पत्रकार दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने पत्रकारांचा सन्मान

वडगाव मावळ : पत्रकार दिनानिमित्त शनिवारी (दि. 6) मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने मराठी पत्रकारितेचे जनक, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

यावेळी मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष दत्तात्रय पडवळ, मावळ तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष विशाल वहिले, पुणे जिल्हा सरचिटणीस सुनिल शिंदे, जेष्ठ नागरिक सेल मावळ तालुका अध्यक्ष पांडुरंग दाभाडे, भरत राजीवडे, मावळ तालुका विद्यार्थी कॉग्रेस अक्षय मु-हे, माग्रा.प.सदस्य बारकुभाऊ ढोरे, नरेंद्र मु-हे, शंकर मोढवे, बाळासाहेब तुमकर, पंकज भामरे, श्रेयस भिडे, प्रणव ढोरे, राहिल तांबोळी आदी उपस्थित होते.

स्थानिक, जिल्हा, राज्य, देश तसेच जागतिक पातळीवरील समस्या आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवणाऱ्या व रचनात्मक उपक्रमांना यथायोग्य प्रसिद्धी देणाऱ्या, लोकशाहीचा वैचारिक कणा तसेच चौथा स्तंभ असलेल्या मावळ ग्रामीण पत्रकार संघातील पत्रकार बंधुंना सन्मानित करण्यात आले.

यावेळी जेष्ठ पत्रकार विजय सुराणा, ज्ञानेश्वर ठाकर, गणेश विनोदे, सचिन ठाकर, सचिन शिंदे, संकेत जगताप, संजय दंडेल, सतिश गाडे, प्रभाकर तुमकर,महादेव वाघमारे, योगेश घोडके, अभिषेक बोडके आदिंना सन्मानित करण्यात आले.

महिलांवर अत्याचार केलेल्या भाजपाच्या आयटी सेल पदाधिकाऱ्यांचा निषेध

पिंपरी: राष्ट्रवादी काँग्रेस पाटी पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) च्यावतीने वाराणसी येथे भाजप पदाधिकाऱ्यांनी महिलेवर केलेल्या अत्याचाराविरोधात निषेध आंदोलन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी येथे आंदोलन घेण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादीचे वरिष्ठ उपाध्यक्ष काशिनाथ जगताप म्हणाले की अमित शहा गृहमंत्री असताना देशात महिलांवरील अत्याचार वाढत आहे आणि वाराणसीमध्ये झालेल्या प्रकरणात तर आयटी सेलचेच पदाधिकारी आहेत. भाजपचे खासदार आमदार महिलांवर अत्याचार करण्यात आघाडीवर असतात.ही भारतीय जनता पाटी आहे का बलात्कार पाटी आहे असे काशिनाथ जगताप म्हणाले.

प्रदेश सरचिटणीस राजन नायर म्हणाले की भाजपची विचारसरणी कायम महिला विरोधी आहे आणि त्यातूनच त्यांच्या कार्यत्यांकडून असे कृत्य होत आहे. मुख्य प्रवक्ते माधव पाटील म्हणाले की भाजप ही वॉशिंग मशीन आहे आणि गुन्हेगारांना माफ करण्यात भाजप कायम पुढे असते. अर्बन सेल अध्यक्षा ज्योती जाधव,अल्पसंख्यांक अध्यक्ष अल्ताफ शेख,प्रतिभा वाघमारे,सुप्रिया कवडे यांनीही भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या या कृत्याचा निषेध केला.

यावेळी शहर उपाध्यक्ष अनिल भोसले, चिंचवड विधानसभा अध्यक्ष सागर चिंचवडे,कामगार सेल अध्यक्ष संदीप शिंदे, भोसरी विधानसभा विध्याथी अध्यक्ष नितीन मोरे, ओबीसी सेल भोसरी विधानसभा अध्यक्ष संतोष माळी, उद्योग व्यापार सेलचे चिटणीस बापू सोनवणे विजय बाबर,संघटक विवेक विधाते, झोपडपट्टी सेल अध्यक्ष गणेश काळे, सुधीर अवचिते रोहन वाघमारे आदी कार्यकर्त्यांनी भाजपच्या पदाधिकाऱ्यांचा निषेध केला.

हडपसर शिवसेना शाखेच्या वतीने सिध्दी वृध्दाश्रमात फळे वाटप

हडपसर. : हडपसर शिवसेना शाखेच्या वतीने कामधेनु सोसायटीतील सिद्धी वृध्दाश्रमात स्व.मीनाताई बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीचे औचित्य साधून वृध्दाश्रमातील वृद्धांना फळे वाटप करण्यात आले. हड़पसर विधानसभा संघटक संजय बप्पू सपकाळ यानी बाळासाहेबांची सावली तमाम शिवसैनिकांची माऊली माँ साहेब मीनाताई ठाकरे यांचा जन्मदिवस(ममता दिन)निम्मित सिद्धी वृद्धाश्रम ,कामधेनू इस्टेट हडपसर येथे फळांचे वाटप करण्यात आले याप्रसंगी शाखा प्रमुख अजय सकपाळ, कुणाल सपकाळ, सुरेश दोरी, संचालिका छाया माने सरवदे, सुनील माने, यशराज माने, अलका वराडे, अलका होलम, विल्मा सोन्स, सुशीला नालबागले, जयश्री जाधव, सुनीता जाधव उपस्थित होते.

जंक्शन येथे आ. आव्हाड यांच्या वक्तव्याचा निषेध; पोलिस ठाण्यात तक्रार

बारामती : आमदार जितेंद्र आव्हाड यांनी रामाबद्दल केलेल्या वक्तव्याचा जंक्शन (ता. इंदापूर) येथे तीव्र निषेध करून त्यांच्या प्रतिमेला जोडे मारण्यात आले.

आमदार जितेंद्र आव्हाड यांनी राम हे मांसाहारी होते, असे वक्तव्य केल्याने विविध स्तरातून त्यांच्या या वक्तव्याचा तीव्र निषेध करण्यात येऊन विविध ठिकाणी आंदोलन सुरू आहेत. आव्हाड यांच्या वक्तव्याचा जंक्शन या ठिकाणी तेवर शब्दात निषेध व्यक्त करून आमदार आव्हाड यांच्या प्रतिमेला जोडे मारून तसेच शाई फासून आंदोलन करण्यात आले. आनंदनगर, जंक्शन, वालचंदनगर, सणसर, निमसाखर व कळंब परिसरातील बजरंग दल व हिंदू बांधवांनी एकत्र येऊन वालचंद नगर पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली. यावेळी आमदार आव्हाड यांच्या निषेच्या घोषणा देण्यात आल्या.

यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुरेश कापडी, अरविंद बुचके, विजय पिटके तसेच अप्पासाहेब क्षीरसागर, सागर फडणीस, योगेश कणसे, संदिप कणसे, सौरभ चव्हाण, बजरंग रायते, सागर गुप्ते, संदीप कोकरे, दिपक खरे, सुहास वाळिंबे, देवेंद्र पालीवाल, अजिनाथ रूपनवर, भाजपचे माऊली चौरे, सचिन अचलारे आदींसह बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते आणि बहुसंख्य रामभक्त उपस्थित होते.

यावेळी माजी सैनिक महेंद्र चव्हाण जहाल शब्दात निषेधात्मक मनोगत व्यक्त केले.यावेळी वालचंद नगर पोलीस स्टेशन तर्फे पोलिस उपनिरीक्षक अतुल खंदारे, पोलिस उपनिरीक्षक मिलिंद मिठापल्ली व पो.हवालदार गणेश काटकर उपस्थित होते.

आशयप्रधान आणि वास्तवावर भाष्य करणारी नाटकं हवीत

शरद पवार यांनी व्यक्त केली भावना

१०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे दिमाखदार सोहळ्यात उद्घाटन

पिंपरीः प्रतिनिधी

नाटक हे ज्ञान आणि मनोरंजनाचे साधन आहे. निखळ मनोरंजन करणारी, आशयप्रधान आणि वास्तवावर भाष्य करणारी नाटकं व्हायला हवीत. प्रायोगिक व व्यावसायिक, बाल रंगभूमीला विशेष अनुदान राज्य सरकारने दिले पाहिजे. तसेच ज्येष्ठ कलाकारांच्या मानधनात वाढ करावी, तिकीट दरात कपात व्हावी अशी अपेक्षा १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केली.

१०० वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचा उद्घाटन सोहळा आज पिंपरी- चिंचवड येथे पार पडला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, स्वागताध्यक्ष राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, ९९ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष प्रेमानंद गज्वी, १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष जब्बार पटेल, आमदार उमा खापरे, आमदार अण्णा बनसोडे, आमदार श्रीरंग बारणे, उद्योगमंत्री उदय सामंत, अभिनेते मोहन जोशी, अशोक हांडे, डॉ. डी. वाय पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले. अ. भा. म. नाट्य परिषद पिंपरी शाखेचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल, उपाध्यक्ष सुरेशकुमार साकला, उपाध्यक्ष नरेश गडेकर, अ. भा. म. नाट्य परिषद कोथरूड शाखेचे अध्यक्ष सुनील महाजन, पुणे जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, पिंपरी झ्र चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह आदी उपस्थित होते. या सोहळ्यात मावळते ९९ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष प्रेमानंद गज्वी यांनी १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष जब्बार पटेल यांना संमेलनाअध्यक्षांची सूत्रे सुपूर्द केली.

पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, चित्रपटसृष्टी आधी हजारो वर्ष सर्वाधिक प्रभावी माध्यम ही रंगभूमी होती. आता जवळपास सर्व निर्माते कलाकार हे हिंदी चित्रपटाकडे वळत आहेत. त्यामुळे मराठी रंगभूमी ओस पडत आहे. तसेच हल्ली डिजिटल माध्यमातही नाटकं सादर होतात. मात्र त्यामध्ये रंगभूमीचा जिवंतपणा नसतो असेही पवार यांनी सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, देशाला ज्याप्रमाणे पुरातन मंदिरं आणि शौर्याचा इतिहास आहे. तसाच नाट्य आणि नृत्य परंपरेचा देखील इतिहास आहे. त्यामुळेच मराठी प्रेक्षक ओटीटी आणि सोशल मीडिया असताना देखील नाटकांना गदी करतात. राजकारणी चांगले कलाकार आहेत असे बोलले जाते. मात्र तुमची कला आमच्या पेक्षा अवघड आहे. राजकारणात कधी कधी धाडसी निर्णय घेतले जातात. दीड वर्षांपूवी सत्ता बदलाचा पहिला अंक झाला आहे. आता दुसरं अंक सुरू आहे. तर निवडणुकीच्या निकाला नंतर तिसरा अंक पार पडणार आहे. तसेच नाटकांचे प्रश्न सोडविण्यासाठी विशेष बैठक घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

उदय सामंत म्हणाले, १०० नाट्य संमेलन होताना भाऊसाहेब भोईर यांनी माजी संमेलनाअध्यक्षांची आठवण ठेवली ही कौतुकास्पद आहे. ज्या प्रमाणे उद्घाटन सोहळा होत आहे. त्याप्रमाणे उवरीत विभागीय संमेलनं व्हायला हवीत. मात्र संमेलन होत असताना त्यावेळी बॅक स्टेज कलाकार, तंत्रज्ञान यांचा देखील विचार व्हायला पाहिजे.

प्रशांत दामले म्हणाले, आम्हा कलाकारांसाठी नाट्य संमेलन दिवाळी असते. प्रत्येक जण नाटक, ओटीटी, सिनेमा यामध्ये काम करत असतो. मात्र सगळे यामधून वेळ काढून या संमेलनासाठी येतात. आमचे विचार व्यक्त करण्यासाठी ही योग्य जागा आहे. रसिक प्रेक्षकांनी पुढच्या पिढीला नाटक पाहण्याची सवय लावावी, अशी अपेक्षा यावेळी प्रशांत दामले यांनी व्यक्त केली. तसेच राज्यातील नाट्यगृहाच्या दुरावस्थेवर व गैरसोईवर, भाडेवाढीवर भाष्य करीत त्यावर उपाय योजना करण्यासाठी दामले यांनी मुख्यमंत्र्यांकडे विनंती केली.

मावळते नाट्य संमेलनाअध्यक्ष प्रेमानंद गज्वी यांनी यावेळी विविध मागण्या मांडल्या. तसेच, नाट्य संमेलनाअध्यक्षांना मिळणारा निधी कमी आहे. तो वाढून मिळावा, त्याचप्रमाणे नाट्य परिषदेच्या कार्यालयात नाट्य संमेलनाध्यक्षांना वेगळे दालन व्हावे, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. सध्या सामाजिक कुरूपता जी निर्माण झाली आहे. ती दूर करण्यासाठी सर्व कलाकारांनी पुढे यायला पाहिजे. असेही त्यांनी सांगितले.

१०० व्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल म्हणाले, माज़्या आजवरच्या प्रवासात अनेक दिग्गजांचे योगदान आहे. नाट्यसृष्टीचे अनेक प्रश्न आहेत. आज प्रामुख्याने मी नाटकात येऊ इच्छित असलेल्या मुलांसाठीचा महत्वपूर्ण विषय मांडत आहे. राज्याच्या प्रत्येक विद्यापिठात नाट्य विभाग आहे मात्र त्यांना त्यासाठीचा खर्च त्यांनीच उभा करायचा आहे, हा खर्च ५ ते ७ कोटी रुपयांचा आहे, प्रत्येक विद्यापीठाला तो झेपणारा नाही यामुळे राज्य सरकारने प्रत्येक विद्यापीठाच्या नाट्य विभागाला अनुदान दिले पाहिजे. तसेच इथे सादर होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नाटकांना सेन्सॉरशिप लावू नये असे सांगितले.

नाट्य संमेलनाचे आयोजक भाऊसाहेब भोईर म्हणाले, मोरया गोसावींची ही भूमी आहे. २७ वर्ष काम केल्याचे १०० वे नाट्य संमेलन हे फळ आहे. पुणे ही सांस्कृतिक नगरी आहे पण पिंपरीला उप सांस्कृतिक राजधानी मिळावी अशी आमची अपेक्षा आहे. सर्वांच्या मदतीने हे नाट्य संमेलन होत आहे. यावेळी मी लोक कलावंतांचे पुनर्वसन करावे, अशी मागणी भाऊसाहेब भोईर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केली.

यावेळी नाट्य संमेलनाची स्मरणिका ह्यनांदीह्न, नाट्य संमेलनाध्याक्ष प्रेमानंद गज्वी यांचे आत्मकथान ह्यरंगनिरंगह्न याचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अ. भा. म. नाट् परिषदेचे कार्याध्यक्ष प्रास्ताविक अजित भुरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद कुलकणी यांनी तर सतीश लोटके यांनी आभार प्रदर्शन केले.

रामकृष्ण मोरे नाट्यगृहाचा विषय तत्काळ निकाली

पिंपरी चिंचवड मधील प्रा. रामकृष्ण मोरे पूवी अतिशय चांगल होत. मात्र आता रात्री नाट्य प्रयोग संपल्यावर तेथे जेवण वाढण्यासाठी ५०० रुपये घेतले जातात. हे दुर्दैवी आहे. तसेच येथे लाईट बील आशिया खंडात सर्वाधिक घेतलं जातं, अशी खंत प्रशांत दामले यांनी व्यासपीठावर भाषण करताना बोलून दाखवली. यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तात्काळ आयुक्तांना बोलावून हा प्रश्न मागी लावला.